# वसई-विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती (ई) नालासोपारा

### ता.वसई, जि. पालघर

दुरध्वनी क्र. (०२५०) २४०२१७९ २४०२५६३

जा.क्र.वविशम/साप्रवि/ २६१ /२०-२१
दिनांक :- १०/०६/२०२०

**जाहिर दरपत्रक**

याद्वारे कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मौजे मौजे भुईगाव खुर्द विभागातील कुंभेर तलाव तसेच मौजे नवाळे विभागातील नवाळे तलाव व वाटाण तलाव सन २०२० ते सन २०२३ या तीन वर्षांकरिता मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी दरपत्रक मागविणेकामी जाहिर दरपत्रक सुचना दि. १०/०६/२०२० रोजी सका. ११.०० वाजलेपासून ते दि. १९/०६/२०२० रोजी ४.०० वाजेपर्यंत vvcmc.in या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेंत येत आहे. दरपत्रक धारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि. १९/०६/२०२० रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (ई) नालासोपारा, सामान्य प्रशासन विभागात सादर करावेत.

| अ.क्र. | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम | ठेकेदाराने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | कुंभेर तलाव | २,६३,७६५/- | |
| २. | नवाळे तलाव | १,३६,८३९/- | |
| ३. | वाटाण तलाव | ४२,६६५/- | |

**अटी-शर्ती**

१. दरपत्रक धारकाने दरपत्रकातील दर भरताना जी.एस.टी. करासहित दर भरावयाचे आहेत.
२. दरपत्रकधारकांचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यांत यावी.
३. दरपत्रकधारकांनी सनदी लेखापाल (C.A.) ने प्रमाणित केलेले वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे.
४. एक वर्षाचा अनुभव किंवा कामाचा कार्यादेश (शासकीय) सादर करणे आवश्यक आहे.
५. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथील सामान्य प्रशासन विभागात सादर करणे बंधनकारक राहील.
६. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालात उपस्थित राहून रु. १००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून द्यावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यांत येईल.
७. दरपत्रकातील दर सादर करताना सर्व करासहित दर्शविण्यात यावे.
८. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महापालिकेस राहील.
९. वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
१०. दरपत्रकधारकांनी वरील तलावांसाठी वेगवेगळी दरपत्रके सादर करणे बंधनकारक असेल. तलावांची एकत्रित दरपत्रके स्विकारण्यांत येतील.
११. वरील तलावांची दरपत्रके बंद लिफाफ्यात दि. १९/०६/२०२० रोजी दु. ४-०० वाजता प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथे सादर करावित.
१२. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. १९/०६/२०२० रोजी संध्या ४.३० वाजता मा. सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

09. 06. 2020.
(पंकज भुसे)
सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScan